# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृ ष मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र वभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महा वद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला स मतीची साप्ताहिक बैठक दि. १९/११/२०२४

## जिल्हा :पुणे

मागील आठवडयाचे हवामान :

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३०.१ ते ३१.५ अंश सेल्सिअस तर कमान तापमान १२.८ ते २०.७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८३ ते ९४ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३६ ते ५३ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १.५ ते ३.२ क.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान २६ ते २८ अंश सेल्सिअस, तर कमान तापमान ११ ते १३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८० टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५७ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०५ ते ०७ क.मी. दरम्यान राहील. आकाश निरभ्र ते अंशतः ढगाळ राहील. वा-याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१३/११/२०२४ ते १९/११/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१९/११/२०२४ ते २३/११/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **13** | **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | दिनांक | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस ( ममी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 30.5 | 31.0 | 31.5 | 30.7 | 31.5 | 31.2 | 30.1 | कमाल तापमान(अं.से.) | 27 | 26 | 27 | 28 | 28 |
| 14.6 | 15.2 | 19.9 | 20.7 | 18.3 | 14.4 | 12.8 | कमान तापमान(अं.से.) | 12 | 11 | 11 | 12 | 13 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 0 | 1 | 1 | 0 | 1 |
| 94 | 94 | 83 | 93 | 91 | 92 | 94 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 78 | 79 | 81 | 82 | 81 |
| 36 | 49 | 53 | 46 | 37 | 37 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 56 | 57 | 58 | 59 | 57 |
| 2.9 | 3.2 | 2.2 | 1.5 | 2.5 | 3.0 | 3.0 | वाऱ्याचा वेग ( कमी/तास) | 7 | 6 | 6 | 5 | 6 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 96 | 97 | 97 | 94 | 100 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १९ ते २३ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २४ ते ३० नोव्हेंबर, २०२४ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | | • शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• रब्बी पकांची पेरणी झालेल्या शेतज मनीमध्ये आंतरमशागत (उगवणीनंतर २ ते ३ आठवड्यानी) तसेच योग्य पाण्याचे नियोजन करावे. |
| भात | कापणी ते साठवणूक अवस्था | भाताच्या लोंब्यामधील ८० ते ९० % दाणे पक्व झाल्याचे दिसताच वैभव वळ्याच्या सहाय्याने पकाची कापणी ज मनीलगत करावी. यंत्राच्या सहाय्याने कापणी केल्यास वेळेत व खर्चात बचत होऊ शकते. कापलेला भात वळण्यासाठी १ ते २ दिवस पसरून ठेवावा व नंतर मळणी करावी. चांगला उतारा मळवण्यासाठी मळणीयंत्र वापरावेत. दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के होईपर्यंत भात वाळवावा. नंतर कोरड्या, स्वच्छ व सुर क्षत जागी धान्याची साठवण करावी. |
| गहू | पेरणी व उगवण अवस्था | उत्पादनातील घट टाळण्यासाठी पेरणी लवकर उरकून घ्यावी . उगवणीनंतर पकाची वरळणी व नांग्या भरणे आवश्यक आहे. वरळणी करताना चांगली जोमदार रोपे ठेवावीत. |
| हरभरा | पीक वाढीची अवस्था | उगवणीनंतर १० ते १२ दिवसांनी पकाची वरळणी करणे आवश्यक आहे. वरळणी करताना चांगली जोमदार रोपे ठेवावीत , दोन ओळीतील अंतर ३० सेमी व दोन रोपातील अंतर १० सेमी ठेवावे. पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण वरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० दिवसाचे असताना पहिली आ ण ३० दिवसाचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी केल्याने जमीन भुसभूशीत होवून ज मनीत हवा खेळती राहते व त्यायोगे पीक वाढीस पोषक वातावरण तयार होते तसेच ज मनीतील बाष्पीभवनाचा वेग कमी होवून ओल अ धक काळ टिकण्यास मदत होते. कोळपणी शक्यतो वाफशावर करावी. कोळपणीनंतर ऐक खुरपणी करावी. पहिल्या ३०-४५ दिवसात शेत तण वरहीत ठेवावे हे उत्पादनाच्या दृष्टीने आवश्यक असते. हरभरा पकांत पक्षी थांबे म्हणून ज्वारीच्या दाण्याचा उतवडा करावा. |
| तुर | शेंगा भरण्याची अवस्था | शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये पकास आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. कडीच्या प्रादुर्भावाचा अंदाज घेऊन प्रती हेक्टरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे ५० ते ६० प्रती हेक्टर उभारावेत. तुरीमधील शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी /पसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक कड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतर पक असल्यास कडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एचएन.पी.व्ही **(HNPV)** य़ा जै वक कडनियंत्रणाचा वापर करावा . फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५**%** दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील **(HNPV)** ५०० मली ५०० लटर पाण्यात मसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८ .५ **%** प्रवाही क्लोरॲट्रीनिलीप्रोल १५० मली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लटर पाण्यात मसळून फवारणी करावी. |
| करडई | पीक वाढीची अवस्था | पीकाच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण वरहीत ठेवणे आवश्यक आहे. आवशक्यतेनुसार कोळपणी कंवा खुरपणी करावी त्यामुळे ज मनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पकांची व तणांची परस्पराशी स्पर्धा होणार नाही. |
| कापूस | वेचणी/ साठवणूक अवस्था | शेतातील अंदाजे ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर पहिली वेचणी करावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने २ ते ३ वेचण्या कराव्यात. वेचल्यानंतर कापूस ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावा. |
| आंबा | पीक वाढीची अवस्था | आंब्याच्या नवीन फुटीवरील रस शोषक कडींच्या नियंत्रणासाठी २.८ टक्के ई.सी. डेल्टामेथ्रीन ९ मली प्रती १० लटर पाण्यातून फवारणी करावी. |
| चारा पक | पेरणी अवस्था | रब्बी हंगामात पशुधनासाठी मका, ओट, बरसीम, लसून घास व ज्वारी या चारा पकाची पेरणी |

| | | |
|---|---|---|
| | | करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व व वध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/ टोचून घ्यावे. पाण्याच्या हौदांची नियमत स्वच्छता करून चुना लाऊन घ्यावे. कमान तापमानात घट अपेक्षत असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घ्यावी. |
| *टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. | | |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म. व., पुणे.

दि. : १९.११.२०२४

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृ ष हवामानशास्त्र वभाग, कृ.म. व., पुणे